मयूर शरद जोशी
सी.ए.

# परिभाषा संगण कीय घोटाळ्यांची

''आर्थिक हानि पोहचवण्यासाठी अथवा एखाद्या व्यवसायाचे बाजारातले, धंद्यातले अथवा व्यवसायातले नाव खराब करण्यासाठी संगणकाचा वापर करणे'' हा संगणकीय घोटाळे या संज्ञेचा प्रचलित अर्थ . संगणकीय घोटाळ्यात संस्थेला, व्यवसायाला हानि पोहचवायची खूप मोठी ताकद आहे. घोटाळ्याचा शिल्पकार नामानिराळा राहून विविध उचापत्या करु शकतो.

खरं तर संगणक व्यवसायाने भारताला जगात एक वेगळं महत्व प्राप्त करुन दिलं आहे, त्याशिवाय भारतातल्या सामान्य मध्यमवर्गीय माणसाचं राहणीमानही संगणकांच्या आगमनाने सुधारलं आहे. २००० साली भारतीय भांडवल बाजारात जी तेजीची लाट आली आणि निर्देशांकाने ६००० ची पातळी गाठली तीही संगणक उद्योगामुळेच. डबघाइला आलेल्या परकीय चलन साठ्याची उपलब्धी मुबलक केली ती याच व्यवसायाने, भारतीय उद्योजकांना निर्यातीची सवय लावली तीही याच संगणक उद्योगाने.

संगणक व्यवसाय हे भारतीय उद्योग जगताला पडलेले सुंदर स्वप्न आहे. पण या सुंदर स्वप्नाच्या मागे दडली आहे ती शक्यता, भिती - भाविष्यातल्या संगणकीय गैरप्रकारांची. अजून आपलं संगणकीकरण हे पूर्णतः प्रगल्भ झालेलं नाही पण जसं जसं ते प्रगल्भ होतं जाइल, संगणकावर विसावणं वाढेल तसं तसं आपल्याला जाणवायला लागेल ते संगणकाचं भेसूर रुप- संगणकीय घोटाळ्यांच्या माध्यमातून.

भारतात मुख्यतः सात प्रकारचे संगणकीय गैरव्यवहार होतात. संगणकीय घोटाळे ही संज्ञा भारतात बरीच व्यापक झालेली आहे.

१.आर्थिक घोटाळाः संगणकाचा वापर हा आर्थिक घोटाळ्यांसाठी करणं खूप सोपं आहे. यासाठी माणसाला लागतात ती इतर कोणाची तरी गुप्ताक्षरं. आर्थिक दरोडे संगणकाव्दारे केले तर ते करायला सोपे आणि पचवायला अवघड पडतात. सन २००२ साठी प्रसिध्द झालेल्या आकडेवारीनुसार भारतीय बॅकात एकूण ५६२ कोटीचे घोटाळे झाले ते लेखणी आणि संगणकाचा उंदीर वापरुन तर ५.६ कोटीची रक्कमेचा नाश दरोड्यांत झाला. यावरुनच कळून येइल की संगणकाची संहारक क्षमता किती मोठी आहे.

२. हॅकिंगः संगणकीय गैरव्यवहारातला सगळ्यात महत्वाचा प्रकार. दुस-याच्या संगणकात त्याच्या परवानगी शिवाय घुसणे म्हणजे हॅकिंग. या हॅकिंगचे अनेक प्रकार आहेत. काही हॅकिंगचे प्रकार तर भयानक जीवघेणे असतात. म्हणूनच असेल बहुधा सध्या वीमा कंपन्यांच्या आशावादाला उधाण आलं आहे. त्यांना फार वाटतंय आता भारतात हॅकिंग वीमा पण चालू होइल.

३. गुप्त माहिती पळवणे : सध्याचं युग आहे ते स्पर्धेचं. प्रत्येकाला आपला व्यवसाय वाढवायचा आहे. व्यावसायिक महत्वाकांक्षा राक्षसी स्वरुप धारण करायला लागल्या आहेत. संवेदनशील माहिती साठवायचं सगळ्यात चांगलं उपकरण जरी संगणक असलं तरी सगळ्यात धोकादायक उपकरणदेखील तेच आहे. त्यामुळे एखाद्याच्या संगणकात जर बेकायदेशीर प्रवेश मिळवला तर त्यात असलेली संवेदनशील माहिती त्या संस्थेच्या विरोधात वापरली जाउ शकते, सरकारी निवीदा भरण्यासठी त्याचा ऊपयोग होउ शकतो कधी कधी ब्लॅकमेलींगचे प्रकारपण घडू शकतात.

मयूर शरद जोशी
सी.ए.

४.कार्यप्रणालीत फेरफार : संगणकीकरणाचा आवाका जसा वाढत जाइल तसं संगणकीय प्रणालींत फेरफार करणं वाढायला लागेल. प्रामुख्याने याचा दणका बसणार आहे तो मालक मंडळींना. एखाद्या कर्मचा-याला कमी करणार आहेत अशी कुणकुण त्या कर्मचा-याला लागली तर तो अशा प्रकारचा एखादा कार्यक्रम लिहू शकतो जेणे करुन त्याचं नाव संगणकीकृत हजेरीपटावरुन कमी केल्यास त्या संस्थेच्या संगणकांवर असलेली सगळी माहिती क्षणार्धात पुसली जाउ शकते.

४. जंतू विषाणू,जीवाणू: या तीन गोष्टींमुळे संगणक आजारी पडतो. त्याची कार्यक्षमता कमी होते. माणूस आजारी पडल्यावर डॉक्टरच्या बोडख्यावर पैसे ओतत बसावे लागतात ना अगदी तसेच संगणक आजारी पडल्यावर या विषाणू,जीवाणू अथवा जंतूंचा नायनाट करण्यासाठी लाखो रुपयांचा चुराडा करत बसायला लागतो.

५.वैयक्तिक वापरः संगणक हे उपकरण सहज उपलब्ध असले तरी शेवटी ती गुंतवणूक आहे. भारतात काही व्यवसाय हे पूर्णतः संगणाकाभिमुख आहेत. मेकेंझी या जगप्रसिध्द सल्लागार कंपनीच्या मते भारतात संगणकाभिमुख व्यवसाय वाढायला प्रचंड वाव आहे. यात कॉल सेंटर्स, मेडिकल ट्रान्सक्रिप्शन युनिट्स हे काही महत्वपूर्ण व्यवसाय जे संगणकावरच होउ शकतात.एखादा मेडिकल ट्रान्सक्रिप्शनिस्ट सकाळच्या वेळी मालकासाठी तर त्याच संगणकाचा आणि इतर उपकरणांचा वापर स्वतःच्या वैयक्तिक व्यवसायासाठी करु शकतो. त्याशिवाय मालकाच्या इंटरनेटच्या तासांचा वापर करणे, नोकरीच्या कामावरच्या संगणकावर वैयक्तिक माहिती साठवणे, अश्लिल चित्रं कार्यालयीन संगणकावरुन उतरवणे अशा अनेक प्रकारे संगणकाचा गैरवापर केला जातो.

६. नकल करणेः सॉफ्टवेअर पायरसीमुळे सगळ्यात जास्त तोटा होतो आहे तो आपल्या हिंदी चित्रपट सृष्टीला. कितीही चांगला चित्रपट काढा चित्रपटगृहात जाउन बघितला जातच नाही.याशिवाय जी महागडे कार्यक्रम असतात प्रो-इ/ऑटोकॅड वैगरे सारखे ते सहजपणे आणि मुबलक प्रमाणात उपलब्ध होउ लागले आहेत. पायरेटेड गोष्टी घेणं बरोबर नाही हे मनातून लाख पटत असेल पण त्याची किंमत माणसाला प्रवृत्त करते.

७. सायबर हल्लाः संगणकाच्या युगात उदय झाला आहे तो माहिती तंत्रज्ञानाच्या दळणवळणाचा.कितीही छोटा व्यवसाय असला तरी इ-मेल आणि तुटकं फुटकं का असेना पण एक संकेतस्थळ या व्यवसायाच्या महत्वाच्या गरजा बनल्या आहेत. विविध युक्त्या , प्रयुक्त्यांनी या संकेतस्थळांवर थेट हल्ला बोलला जातो. नासाडी केली जाते. सायबर हल्ले आणि प्रत्यक्ष शस्त्रांस्त्रांनी केलेले हल्ले हे भयानक घातक ठरु शकतात. हॅकिंगव्दारे दुस-याच्या संगणकात प्रवेश मिळवला जातो आणि सायबर हल्ल्यांत दुस-याच्या संगणकीय प्रणालींमध्ये धोकादायक अथवा विनाशकारक बदल केला जातो.

तर ही होती संगणकीय घोटाळ्यांची परिभाषा, व्याख्या. यातला प्रत्येक घटक हा स्वतंत्र संशोधनाचा विषय आहे.जगभरात यातले उद्योग चाललेच असतात. आपण या सगळ्या घोटाळ्यांच्या निर्मूलनात कुठे मोडतो हे बघणं फार आवश्यक आहे.